महाराष्ट्र शासन
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
**डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.**

दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२
ई-मेल depmah2@gmail.com

जा.क्र./प्राशिसं/आरटीई-५२०/२०२१/ 1317 दिनांक : १९/०३/२०२१

19 MAR 2021

प्रति,
शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई,
महानगरपालिका.

**विषय :- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता आर.टी.ई. २५ टक्के ऑनलाईन प्रवेशाबाबत.**
**संदर्भ :- आपले पत्र क्र.उपशिअ/खा.प्रा.शा./आरटीई२५टक्के/६२० दिनांक १६/०३/२०२१**

उपरोक्त विषयाबाबत आपण संदर्भिय पत्रान्वये श्री. सचिन बा. नाचरे यांच्या पाल्याला सन २०२१-२२ करीता आरटीई अंतर्गत ऑनलाईन अर्ज भरत असताना ऑनलाईन प्रवेशासाठी ३१/१२/२०२१ या तारखेनुसार त्यांच्या पाल्याचे वय पात्र नाही असा संदेश येत आहे. त्यांच्या पाल्याचा जन्म दिनांक १६/०६/२०१४ असा असून प्रवेश अर्ज भरण्यास सिस्टिम मध्ये योग्य ते बदल करुन मिळण्याबाबत या संचालनालयास विनंती केली आहे.

तरी आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. आरटीई-२०१८/प्र.क्र.१८०/एस.डी-१ दिनांक १८/०९/२०२० अन्वये इयत्ता १ ली च्या प्रवेशाकरीता बालकाचे दिनांक ३१/१२/२०२१ रोजी वय ६ वर्ष पूर्ण असावे. तसेच शासन निर्णय क्रमांक आरटीई -२०१९/प्र.क्र.११९/एस.डी-१ दिनांक २५/०७/२०१९ अन्वये शाळा प्रवेशासाठी बालकांच्या किमान वयामध्ये जास्तीत जास्त १५ दिवसांची शिथिलता देण्याचे अधिकार मुख्याध्यापकांना देण्यात आलेले आहे. त्यामुळे सन २०२१-२२ करीता आरटीई अंतर्गत इयत्ता १ लीच्या प्रवेशासाठी दिलेली वयोमर्यादा ही वरील नमूद शासन निर्णयान्वये योग्य आहे. तथापि आपली विनंती मान्य करता येणार नाही.

१९.०३.२१

**(द.गो.जगताप)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
शिक्षण संचालनालय, पुणे - १.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
१. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १.



Scanned by CamScanner